फौ.कि.अर्ज क्र.३/२०२६
मॉडर्न एज्युकेशन सोसायटी/
महादेव जाधव
निशाणी क्र.१ लगत

## आदेशीका पुर्व पुरावा

साक्षीदार क्र.१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – अजित तुकाराम चव्हाण |
| वडीलांचे नाव | – तुकाराम अन्याबा चव्हाण |
| वय | – ४६ वर्षे |
| धंदा | – नोकरी |
| राहणार | – य.पा.वाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. |

## सरतपास वकील श्री.पी.डी.जेडगे यांचेमार्फत शपथेवर सुरु

१. मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, आटपाडी हि संस्था सन १९७८ साली स्थापन झालेली आहे. सदर संस्थेमार्फत तालुक्यामध्ये ४ हायस्कूल व ३ ज्यु. कॉलेज सुरू आहेत. सदर संस्थेमध्ये सन २००२ पासून मी पदाधिकारी म्हणून संस्थेचे कामकाज पाहतो. सदर संस्थेचे ऑफिस ग.दि.मा. पार्क बाजार पटांगण जवळ आहे. सदर संस्थेमध्ये सन २०२२ पासून ते २०२७ पर्यंत कार्यकारी मंडळ कार्यरत आहेत. त्यामध्ये मी अध्यक्ष म्हणून कार्यरत आहे. सदर संस्थेचे सर्व दप्तर माझ्या कब्जेत आहेत.

२. या संस्थेचे दोन संचालक सदर कालावधी मध्ये मयत झालेले आहेत. संस्थेचे घटनेप्रमाणे दोन संचालक भरणेसाठी मी व इतर पदाधिका-यांनी दि. ०६.०४.२०२५रोजी संस्था कार्यालयात मिटींग भरवली. सदर मिटींगमध्ये बहुमताने दोन संचालकांची निवड झाली. मयत यशवंत शंकर पत्की यांचे जागी हणमंत दगडू चव्हाण व मयत प्रदीप निवृत्ती विभूते यांचे जागी रमेश रामचंद्र चव्हाण यांची नियुक्ती झाली. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी यांना संचालक मंडळामध्ये त्यांच्या मजीर्तील लोक घ्यावयाचे होते. म्हणून त्यांनी दि. १०.०४.२०२५ रोजी संस्था कार्यालयात मिटींग बोलावली. आम्ही सर्व संचालक मिटींगच्या वेळी कार्यालयात हजर राहिलो. आरोपी हे अल्पमतात असल्यामुळे त्यांच्या मर्जीतील लोक त्यांच्याकडे बहुमत नसल्यामुळे ते सदर मिंटींगला आले नाहीत. सदर मिटींगचे सी.सी.टि.व्ही. फुटेज मी दाखल केलेले आहे. तास ते दिड तास वाट पाहून फोन केला आणि मिटींगला हजर राहण्यासाठी सांगितले. त्यानंतर आम्ही सी.सी.टि.व्ही. समोर सहया करून कोणतेही बोगस संचालकाची नियुक्ती करू नये असे पत्र महादेव विठोबा जाधव यांना त्यांच्या घरी जाऊन देवून आलो. त्यावेळी त्यांनी सदरच्या पत्रास पोहच पावती देण्यास नकार दिला. त्यामुळे घडलेल्या परिस्थीतीचा विडीयो रेकॉर्डीग सादर केले आहे. असे असताना त्यांनी अल्पमतात खोटी प्रोसिंडीग, खोटे कागदपत्रे तयार करून धर्मादाय आयुक्त कार्यालयात बदल अर्ज दाखल केला. सदर बदल अर्जाचे नक्कल काढून आम्हीच पदाधिकारी आहे, आम्ही संस्था आहे असे म्हणून संस्थेचे कामकाजात अडथळे निर्माण केले.

३. दि. ०६.०४.२०२५ च्या मिटींगच्या ठरावानुसार ९० दिवसाच्या मुदतीमध्ये धर्मादाय आयुक्त कार्यालय, सांगली येथे बदल अर्ज दाखल केला. त्यानंतर आम्ही आटपाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. आटपाडी पोलिसांनी काही दखल घेतली नाही म्हणून अधिक्षक व उपअधिक्षक कार्यालय

सांगली येथे तक्रार अर्ज दाखल केला परंतु अदयाप पोलिसांनी काही कारवाई केली नसल्यामुळे सदरचा फौजदारी खटला न्यायालयात दाखल केला आहे. आरोपी यांनी बोगस कागदपत्रे तयार करून संस्थेच्या कामकाजात अडथळा आणल्याबाबत तक्रार दाखल केली. आम्ही दाखल केलेल्या तक्रारीच्या पोच पावत्या व आरोपी यांनी दाखल केलेल्या ठराव व बदल अर्जाचे सही शिक्यांच्या नकला हजर केलेले आहे. मी दाखल केलेल्या कागदपत्राना निशाणी देण्यात यावेत. आरोपी यांनी प्रस्तुतचा गुन्हा करण्यासाठी खोटी कागदपत्रे, शिक्के, लेटर पॅड तयार करून संस्थेची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे, आरोपींवर कडक कारवाई करावी याकरीता सदरचा खटला दाखल केला आहे.

**सरतपास पूर्ण.**

सही/-

----------------

साक्षीदाराची सही / अंगठा

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

2/6/2026.

(अ. जो. बाचुळकर)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

आटपाडी.

दिनांक : ०२/०६/२०२६

*****